नवं नवं... हवं हवं...







# बी कम्फर्टेबल

खास उन्हाळ्यासाठी वेगळ्या कलर स्कीम्स आणि वेगवेगळी प्रिंट्स घेऊन अनेक ब्रॅण्ड्सची समर कलेक्शन्स बाजारात अवतरली आहेत. ऐन उन्हाळ्यात कूऽल होण्यासाठी अगदी उत्तम कपडे...

'आफ्टरशॉक'ने स्पार्कल असलेले ग्लॅमरस कपडे आणले आहेत. उन्हाळ्यातला डल मूड बदलावा, म्हणून 'रोमँटिक ड्रीमर', 'फ्युचरिस्टिक चिक' आणि 'गोल्डन मिस' या तीन प्रकारांत लाइट पेस्टल शेड्सचे हे कपडे आणि ॲक्सेसरीज आफ्टरशॉकच्या नरिमन पॉइंट इथल्या शोरूममध्ये उपलब्ध आहे.

'लेरॉस'ने पाण्याचा थंडावा आणि समुद्राचा रंग असलेलं सळसळतं 'ॲक्वामरीन' हे कलेक्शन आणलं आहे. स्पोर्टिंग लुक असलेलं हे कॅज्युअल कलेक्शन रिलॅक्स होण्यासाठी एकदम मस्त आहे. स्त्री आणि पुरुष, दोघांसाठीही असलेल्या या कपड्यांच्या किमती ७९९ रुपये आणि त्यापुढे आहेत.

अस्सल भारतीय फॅशनला इंटरनॅशनल लुक देणारं 'द डे वेअर कलेक्शन' पार्क्सने आणलं आहे. रंगांशी मस्ती करणारे हे कपडे स्टाइल आणि ट्रेण्ड या बाबतीत अपडेट आहेत. शर्ट, टीशर्ट, डेनिम आणि ट्राउजर्स इथे खिशाला परवडेल अशा किमतीत उपलब्ध आहेत.

ब्लॅकबेरीने नेहमीच्या बोअरिंग फॉर्मल्सच्या पलीकडे जाऊन कॉर्पोरेट क्षेत्रातल्या भारतीय तरुणांसाठी 'अनऑफिशियल' कलेक्शन आणलं आहे. फॉर्मल्ससारख्याच कपड्यांना नव्या फ्रेश रंगांचा आणि नव्या स्टाइलचा लुक देऊन हे कलेक्शन तयार करण्यात आलं आहे. आघाडीच्या डिझाइनर नीता लुल्ला यांनी ड्रेसेस आणि साड्या यांत समर कलेक्शन आणलं आहे. वेगवेगळ्या प्रकारची एम्ब्रॉयडरी केलेले, लेस लावलेले, फुलकारी आणि चिकन वर्क केलेले हे कपडे व्हायब्रंट कलर्समध्ये तयार केले आहेत. कॉटन, शिफॉन आणि जॉर्जेटचे कट वर्क केलेले ड्रेसेस आणि साड्या उन्हाळ्यात अगदी लाइट वाटतील.







